**कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना राबविण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१७/प्र.क्र.६३/फ-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २० सप्टेंबर, २०१७.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यास ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला असून सदर किनाऱ्याजवळ अंदाजे ३०,००० हेक्टर क्षेत्रावर कांदळवने अस्तित्वात आहेत. समुद्रापासून किनाऱ्यांचे संरक्षण तसेच सायक्लॉन व फायान सारख्या नैसर्गिक आपदांपासून कांदळवनांमुळे संरक्षण प्राप्त होते. कांदळवनांचा पर्यावरणीय महत्व विचारात घेता, त्यांना पुरेसे वैधानिक संरक्षण प्रदान करावे, या स्वरुपांचे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेळोवेळी दिलेले आहेत, त्यास अनुसरुन आतापर्यंत सुमारे १५,०८८ हेक्टर शासकीय जमिनीवरील व १,७७५ हेक्टर खाजगी क्षेत्रावरील कांदळवन अनुक्रमे **"राखीव वने"** व **"वने"** म्हणून अधिसूचित करण्यात आलेले आहे. कांदळवनांमुळे किनारी प्रदेशांचे वादळांपासून संरक्षण होते, मासे व खेकडे यांना अल्प वयात संरक्षण मिळून उपयोगी उत्पादन वाढते, पर्यटनाची साधने उपलब्ध होतात व किनारी जैवविविधता टिकून राहण्यास मदत होते.

शासकीय कांदळवनांचे संरक्षण होणे व त्यावर अवलंबून असलेल्या लोकांची उपजिविका यांचा मेळ घालणे, तसेच खाजगी मालकीच्या कांदळवनापासून सुद्धा उपजिविकेची साधने उपलब्ध करुन देणे, कांदळवनाचा दर्जा उंचावणे यासाठी संयुक्त वन व्यवस्थापनाच्या धर्तीवर कांदळवनांचे वैशिष्ठये लक्षात घेऊन **"कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना"** राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे : -

**शासन निर्णय :-**

राज्याचे सागरी व खाडी क्षेत्रालगत असलेल्या गावांतील / नागरी समूहातील गावांमध्ये जर कांदळवन क्षेत्रावर अवलंबून असलेल्या व्यक्ती / मच्छिमारी समाज / अन्य समाज असतील तर अशा ठिकाणी **कांदळवन सह व्यवस्थापन समिती** गठीत करुन सदस्यांचे वैयक्तिक व सामूहिक उत्पन्न वाढवण्यासाठी आणि कांदळवनांचे प्रभावी संरक्षण त्यांचे माध्यमातून करण्यासाठी सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीत **"कांदळवन संरक्षण व उपजिविका निर्माण योजना"** प्रकल्प स्वरुपात (Project Mode) राबविण्यात येईल.

**१.०० योजनेची उदिष्टे :**

१. खाजगी, शासकीय व सामूहिक कांदळवन क्षेत्रास उत्पादनक्षम साधन बनवणे व कांदळवनांचा दर्जा उंचावणे.
२. शासकीय कांदळवनांचे नियोजनबद्ध संरक्षण व संवर्धनामध्ये त्यावर अवलंबून असलेल्या ग्रामस्थांचे योगदान घेणे व त्यांच्या उपजिविका साधनांचा विकास करणे.
३. वन विभाग व स्थानिक जनता यांच्यातील सहजीवन वाढवून परस्पर सहकार्य वृध्दींगत करणे.
४. त्यासाठी अवलंबितत्व असलेल्या व्यक्तींचे समूह तयार करुन अशा संस्थांशी करारनामे करणे, सदर क्षेत्राबाबत सूक्ष्म व्यवस्थापन आराखडा (Micro plan) तयार करणे, सदर समूहांना आवश्यक प्रशिक्षण देणे.